21 MAY 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण संवर्धन, तंत्रज्ञानातून भारत महासत्ता बनेल

## केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांचे प्रतिपादन : डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पर्यावरण संवर्धन, दहशतवादविरोधी भूमिका, तंत्रज्ञानाचा वापर, सुप्रशासन आणि मानवतावादी दृष्टिकोन घेऊन भारताची वाटचाल सुरू आहे. त्याच्या जोरावर आपण महासत्ता बनणार आहोत, असे प्रतिपादन केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पुढारीकार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी 'भारत : एक जागतिक महासत्ता' या विषयावर विचार मांडले. शाहू स्मारक भवनमधील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, समूह संपादक डॉ. योगेश जाधव प्रमुख उपस्थित होते. माहूरकर म्हणाले, कार्बनमुक्त राष्ट्राचा संकल्प, परराष्ट्र संबंध, अनिवासी भारतीयांना बळ देणे, मानवतावादी दृष्टिकोनातून जगातील लहान देशांना मदत करण्याची भूमिका भारताला विश्वगुरू बनविण्याच्या दिशेने नेत आहे. महासत्ता होण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचार, कार्याच्या मार्गाने जाण्यासह इतिहासाचे ज्ञान आणि योग्य अर्थ जाणून घेणे महत्त्वाचे ठरणार आहे.

आतापर्यंत चुकीची ध्येय-धोरणे स्वीकारल्याने आपण महासत्ता बनलो नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचे अनुकरण केले नाही, तर आपल्या देशाचे आणखी नुकसान होईल, असे माहूरकर यांनी सांगितले. या व्याख्यानास प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते. डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले.




कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या पुढारीकार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांनी विचार मांडले. यावेळी डावीकडून डॉ. रणधीर शिंदे, दैनिक पुढारीचे समूह संपादक डॉ. योगेश जाधव, मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

### कट्टरवाद कमी व्हावा..

वाढता धार्मिक कट्टरतावाद कमी झाला पाहिजे. निवडणुकांवर अनावश्यक वेळ, पैसा खर्च होतो. ते टाळण्यासाठी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत एकसूत्रता आणायला हवी. पाच वर्षांचा कालावधी संपल्यानंतर ठरावीक महिन्यात निवडणुका घेतल्या पाहिजेत, असे माहूरकर यांनी सांगितले.

21 MAY 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवरायांच्या प्रेरणेने देश महासत्ता होईल

## डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमालेत केंद्रीय माहिती आयुक्त माहुरकर यांचे उद्गार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

**नीतिमत्तेच्या बळावर भारताची विश्वगुरू म्हणून वाटचाल सुरू आहे. भारत महासत्ता म्हणून विश्वगुरू म्हणून उदयाला येईलच. पण, त्याला अन्य महासत्तांप्रमाणे आर्थिक आणि लष्करी शोषणाचे अंग नसेल, असे सांगत केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहुरकर यांनी या विश्वगुरू बनण्यामागील प्रेरणास्त्रोत हे छत्रपती शिवाजी महाराज असतील, असे स्पष्ट केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पुढारी'कार कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत 'भारत एक जागतिक महासत्ता' या विषयावर उदय माहुरकर बोलत होते. व्यासपीठावर दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, 'पुढारी'चे समूह संपादक डॉ. योगेश जाधव, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

कोणताही देश जगाची महासत्ता होताना अनेक निकषांचा विचार होतो. त्यामध्ये अर्थनीती, जागतिक पातळीवर सामना करावा लागणारा दहशतवाद आणि हवामानातील बदल, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा सर्वांसाठी वापर अशा काही प्रमुख बाबींचा यामध्ये समावेश होतो. त्याशिवाय काही अशा गोष्टी असतात की, त्याचा फार मोठा प्रभाव विशेषतः नैतिक प्रभाव पडत असतो. त्यामध्ये भारतीय योगाचे फार मोठे महत्त्व असल्याचे उदय माहुरकर म्हणाले.

### २०२७ मध्ये पाच ट्रिलियन टप्पा गाठणार

भारतात २०१२ ते २०१९ या काळात लाखो लोक दारिद्र्य रेषेच्या वर आल्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून माहुरकर म्हणाले की, भारताने महासत्ता होण्याच्या दृष्टीने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे, असे मला वाटते. गेल्या सात-आठ वर्षांत पान २ वर

- २०२७ मध्ये ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेचा टप्पा
- प्रशासनात बदल
- सरकारी खर्चात बचत
- सॉफ्टवेअरमध्ये दबदबा

### 'पुढारी'ची संपूर्ण देशाला ऊर्जा

'पुढारी'ची संपूर्ण देशालाच ऊर्जा मिळत आहे. अशा वर्तमानपत्राचे कर्ते-धर्ते डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी त्याची पात्रता आणि प्रतिष्ठा निर्माण केली आहे. 'पुढारी' हा देशातील पहिल्या तीन क्रमांकांच्या वर्तमानपत्रांपैकी एक आहे, असे गौरवोद्गार माहुरकर यांनी काढले. डॉ. जाधव यांच्या कार्याने आपण प्रभावित असल्याचे सांगत, पत्रकार मोठे झाले की, त्यांना राजकारणाचे वेध लागतात. पण निःपक्ष आणि निर्भीड पत्रकारितेचे 'पुढारी' हे मोठे उदाहरण असल्याचे सांगत डॉ. जाधव यांच्यासारख्या पत्रकारांची देशाला गरज असल्याचे ते म्हणाले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत बोलताना केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहुरकर. डावीकडून मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, दै. 'पुढारी'चे समूह संपादक डॉ. योगेश जाधव, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. (छाया : पप्पू अत्तार)

21 MAY 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवरायांच्या प्रेरणेने देश महासत्ता होईल

### शाहूंच्या नगरीत व्याख्यान होत असल्याचा गर्वच

आपले कोल्हापुरात हे पहिलेच व्याख्यान आहे. राजर्षी शाहूंचे संपूर्ण देशात वेगळे स्थान आहे. कोल्हापूर ही त्यांची नगरी, त्याच नगरीत व्याख्यान होत असल्याचा आपल्याला गर्वच आहे, असेही माहुरकर यांनी सांगितले.

(पान १ वरून) या दिशेने आणखी महत्त्वपूर्ण वाटचाल सुरू आहे. दोन वर्षांपूर्वी कोरोना आला नसता तर भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्स एवढी असती. आज ती तीन ट्रिलियन डॉलर्स एवढी आहे. पाच ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा आपण २०२७ पर्यंत गाठणार आहोत. चीनने महासत्ता होण्यासाठी दारिद्र्य रेषेखालील लोकांना त्या रेषेच्या वर आणण्याचे धोरण निश्चित करून ८० कोटी लोकांना दारिद्र्य रेषेच्या वर आणले आणि महासत्तेच्या दृष्टीने एक भक्कम पाऊल टाकले. आज भारत याच दिशेने वाटचाल करीत आहे.

भारताच्या डिजिटायझेशनने जगाला थक्क करून सोडल्याचे सांगून माहुरकर म्हणाले की, युरोपातील दोन मोठे उद्योग स्कोडाचे भारतात पार्टनर आहेत. यावरून युरोपियन देश या डिजिटायझेशनने किती थक्क झाले आहेत हे दिसून येते. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे घडून येते आहे ही फार मोठी गोष्ट आहे. हे होण्यामागे अनेक कारणे आहेत. १९७० पर्यंत देशात अनेक गोष्टी योग्य प्रकारे घडत होत्या. त्यानंतर मात्र उत्तरदायित्व आणि पारदर्शकता यांचा अभाव पहिल्यांदा राजकारणात दिसला आणि तो पाझरत प्रशासनातही आला. त्याचे विपरीत परिणाम आपल्याला भोगावे लागले.

ते म्हणाले, १९७० नंतर नेत्यांना माझ्याशी निष्ठावंत कोण आहे याचे महत्त्व वाटू लागले. त्यातून राजकारण आणि प्रशासन बिघडत गेले. हा माझा आहे. तो माझ्याशी निष्ठावंत आहे. मग त्याला काहीही करू द्या, हा मतप्रवाह जोरकसपणे प्रवाहित झाला आणि त्यातूनच अनेक चुकीच्या गोष्टी घडत गेल्या. १९७० ते ८० या काळात याचा वेग काहीसा मंद होता. पण १९८० नंतर याला वेग आला आणि तो २०१४ पर्यंत सुरू राहिला. या काळात प्रत्येकवेळी काही आर्थिक व्यवहाराशी संबंधित गोष्टी घडल्या असे नाही. पण ज्यांला ज्या सत्तेवर बसविले - मग ते राजकीय असो किंवा प्रशासकीय असो, त्याच्याकडून आपल्याला हवे तसे काम करून घेणे सुरू झाले. यामुळे चुकीच्या गोष्टी घडत गेल्या.

**प्रशासनात सकारात्मक बदल**

२०१४ साली नरेंद्र मोदी सत्तेवर येताच त्यांनी या वैयक्तिक निष्ठेला पायबंद घातला आणि महासत्तेच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली. अनेक कर्तृत्ववान अधिकाऱ्यांची दखल घेऊन त्यांना थेट पंतप्रधान कार्यालयातून त्यांच्या नव्या जबाबदारीच्या पदावरील नियुक्तीचे आदेश जाऊ लागले आणि संपूर्ण प्रशासन एक सकारात्मक बदल घडून आला. हा बदल पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी आणला. त्यांच्या धोरणाचा तो भाग आहे आणि याच धोरणावर आधारित आपले पुस्तक प्रसिद्ध झाल्याचे माहुरकर यांनी सांगितले.

उत्तरदायित्व आणि पारदर्शकता या दोन चाकांवर हा महासत्तेचा रथ दौडत असल्याचे सांगताना माहुरकर म्हणाले की, प्रत्येक खात्याचा एक डॅशबोर्ड तयार करण्यात आला. त्यावर तुम्हाला त्याच संबंधित खात्याची आजची काय अवस्था आहे हे त्याच क्षणी कळते. ही पारदर्शकता प्रशासनात आणण्याचे मोठे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. देशात कोणत्या खात्याने किती काम केले याची माहिती डॅशबोर्डवर उपलब्ध करून देण्यात येते. पंतप्रधान आवास योजनेत कोणत्या गावात किती घरे दिली, किती घरांचे काम सुरू आहे याची इत्थंभूत माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते. तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांसाठी केला तर काय सकारात्मक बदल होतो याचे सर्वात मोठे उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. याचा उपयोग एवढा झाला की, उच्च पातळीवर एकाही मंत्रालयावर एकही आरोप आजतागायत झाला नाही. उत्तरदायित्व आणि पारदर्शकता याचे हे सर्वात मोठे उदाहरण आहे.

**सरकारी खर्चात बचत**

आज शासनात ज्या काही गोष्टी किंवा सेवांची गरज लागते, त्या सर्व गोष्टी गव्हर्मेंट ई-मार्केटिंग या पोर्टलवरून घेतल्या जातात. ज्यांच्याकडे वस्तू व सेवा उपलब्ध आहेत, ते यावर नोंदणी करतात आणि ज्यांना त्याची गरज़ आहे अशी सरकारी खाती येथून त्या वस्तू व सेवा मिळवितात. यामुळे सरकारी खर्चात दहा ते वीस टक्के बचत झाल्याचा दावा माहुरकर यांनी केला.

**आयकर क्षेत्रात बदल**

आयकराच्या क्षेत्रातही आमूलाग्र बदल घडवून आणल्याचे सांगून माहुरकर म्हणाले की, प्रामाणिक करदात्यांवर खूप मोठा विश्वास ठेवण्यात आला. त्यांच्यासाठी अनेक योजना आखण्यात आला. पूर्वीच्या सरकारने सरकारी लाभांचे थेट हस्तांतरण ही योजना आणली खरी. मात्र ती प्रत्यक्षात राबविण्यासाठी संबंधित व्यक्तींची बँक खाती नव्हती. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्यांची जनधन खाती बँकेत उघडण्यासाठी खास योजना आणली. यामुळे सरकारी योजनांचे लाभ आज ४२ कोटी खात्यांमध्ये थेट जमा होतात हे सर्वात मोठे यश आहे. यापूर्वी अशा योजनांचे लाभ घेण्यासाठी चेकचे व्यवहार होत आणि चेक देणारा क्लार्क पाच हजारच्या रकमेसाठी दोनशे रुपयांपासून ते पाचशे रुपयांपर्यंत मागणी करीत असे. मात्र ही सारी व्यवस्था मोडीत काढून पारदर्शकता आणण्यात आली. त्याचा लाभ सर्वसामान्य अशा ४२ कोटी कुटुंबांना झाला हे केवढे मोठे यश आहे. यूपीआय या सेवेमुळे पैशाची देवाणघेवाण सहजपणे करता येतो. हे सर्वात मोठे तंत्रज्ञानाचे यश आहे.

२०७० सालापर्यंत आपल्याला कार्बनचे उत्सर्जन शून्यावर आणायचे आहे. यासाठी फार मोठे नियोजन भारत करीत आहे. यामध्ये भारतच जगाचा विश्वगुरू होणार आहे. त्याचबरोबर विजेच्या क्षेत्रातही आपण क्रांतिकारक पाऊल टाकत आहोत. शंभर गिगावॅट ते ४५० गिगावॅटपर्यंत मजल आपल्याला मारायची आहे. त्यासाठी सौरऊर्जा महत्वाची आहे. ज्या देशात सूर्यप्रकाश सर्वाधिक उपलब्ध, अशा राष्ट्रांच्या सहाय्याने भारत या क्षेत्रातही नेतृत्व करीत आहे आणि त्यासाठी योग्य प्रकारे पावले टाकली जात आहेत. दहशतवादाच्या मुद्द्यावरही भारताने पाकिस्तानला तसेच दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या अन्य संघटनांना जागतिक पातळीवर एकाकी पाडले आहे, हे फार मोठे यश भारताने मिळविले आहे.

**सॉफ्टवेअरमध्ये दबदबा**

विज्ञान तंत्रज्ञानाचा सर्वांसाठी वापर करण्याचे सरकारचे ध्येय आहे. याचा सर्वाधिक वापर भारत करीत आहे. सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात भारताचा जगात दबदबा आहे. त्यासाठी अनिवासी भारतीयांना प्रोत्साहित करण्याचे काम नरेंद्र मोदी सातत्याने करीत आहेत. जेथे जातील तेथे ते भारताची विविध क्षेत्रांतील प्रगती आवर्जून सांगतात. यामध्ये एकाच वेळी १०४ उपग्रह आपण अवकाशात सोडू शकलो याचाही उल्लेख करतात. या सर्व प्रगतीमागे भारताने केलेली आर्थिक प्रगती याचाही उल्लेख असतो, असेही ते म्हणाले.

जागतिक पातळीवर ज्या आयटीचा दबदबा आहे, त्याचे नेतृत्व सत्या नाडेला आणि सुंदर पिचाई यांच्यासारखे भारतीय करीत आहेत. त्यांच्याबरोबर अनेक तरुण हात त्यामागे राबत आहेत. म्हणूनच या क्षेत्रातही भारत विश्वगुरू म्हणावा लागेल, असेही माहुरकर म्हणाले.

पंधरा-वीस वर्षांपूर्वी आपण चीनला घाबरून सीमेवर पायाभूत सुविधा निर्माण केल्या नाहीत. डोकलाममधील समस्या ही त्याचा परिणाम असल्याचे सांगून माहुरकर म्हणाले की, त्यावेळी हे केले असते तर ही समस्या उद्‌भवली नसती. आता हे काम सुरू केल्याने चीनचा जळफळाट झाला आहे.

**इतिहासाचे कमी ज्ञान**

ते म्हणाले, ही सगळी वाटचाल करीत असताना त्यामध्ये काही अडथळे येत आहेत. यातील सर्वात मोठा अडसर आपल्याला इतिहासाचे कमी ज्ञान हा आहे. त्याचबरोबर फेसबुकवर ज्या घाणेरड्या पोस्ट येतात, त्यामुळे आपल्या तरुणाईचे फार मोठे नुकसान होत आहे. मात्र याविरोधात कोणी उभे राहात नाही.

**सावरकरांनी पंचशील तत्त्वाला विरोध केला होता**

पंडित नेहरू यांनी पंचशीलचा पुरस्कार केला. त्याला सावरकरांनी विरोध केला होता. त्यामागे त्यांची तर्कशुद्ध मांडणी होती आणि ती अचूक होती हे चीनच्या आक्रमणावरून पुढे सिद्ध झाले. भाईचारा हे आपल्या पंचशीलचे सूत्र होते तर चीनने मशिनगन, बॉम्ब, सबमरीन, मिसाईल अशी त्यांची पंचसूत्री आणून आपल्यावर आक्रमण केले.

भारतीय लष्कराने पेशावरपर्यंत मजल मारली. बांगला देश स्वतंत्र केला तरी पाकिस्तानचे एक लाख युद्ध कैदी आपल्याकडे होते. तरी आपण ताश्कंद आणि सिमला करारात गमावल्याचे माहुरकर म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा सम्राट असाच उल्लेख केला पाहिजे. कारण त्यांच्या मृत्यूनंतरही हे त्यांचे कार्य सुरू ठेवले. शिवाजी महाराजांचे साम्राज्य हे गुजरातच्या वलसाडपासून ते तामिळनाडूतील जिंजीपर्यंत १६०० कि.मी. एवढे विस्तीर्ण होते. विजयगिरीचे साम्राज्य ७०० कि.मी. होते. त्यामुळे आपण छत्रपती शिवराय यांच्यावर सम्राट शिवाजी हा जो ग्रंथ लिहीत आहोत, त्यामध्ये हा सर्व उल्लेख येणार आहे. भारताला विश्वगुरू होण्यासाठी शिवछत्रपतींचे नेतृत्व हेच प्रेरणादायी असेल, असेही माहुरकर म्हणाले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे हीरकमहोत्सवी वर्ष सुरू आहे. पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांनी १९३३-३४ मध्ये साप्ताहिक 'सेवक'मधून शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचे स्वप्न पाहिले. ते सत्यात उतरण्यासाठी ३० वर्षांचा काळ गेला. त्यांचे विद्यापीठ स्थापनेत मोलाचे योगदान राहिले. डॉ. ग. गो. जाधव यांच्या नावाने शिवाजी विद्यापीठात देशातील पहिले पत्रकारिता अध्यासन सुरू करण्यासाठी दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांचे मार्गदर्शन लाभत आहे. विद्यापीठाची प्रगती व संगीत व नाट्यशास्त्र विभाग, अर्थशास्त्र विभागाच्या उभारणीत डॉ. जाधव त्यांचा मोलाचा वाटा आहे.

१३० कोटी भारतीयांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या 'भारत : एक जागतिक महासत्ता' या विषयावर केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहुरकर यांनी भाषणातून सर्व गोष्टींना स्पर्श केला. 'यूपीआय', डिजिटायजेशनच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या जीवनातील समावेशक गोष्टींचा विचार त्यांनी मांडला. कोरोना काळात या गोष्टींचा मोठा फायदा झाल्याचे त्यांनी सांगितले. अर्थव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पुढे नेण्यासाठी व गरिबी निर्मूलनासाठी देश पातळीवरील नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची आहे. या गोष्टीच भारताला महासत्ता बनविण्यासाठी आवश्यक असून त्यादृष्टीने वाटचाल सुरू आहे. मात्र सोशल मीडिया तरुणाईस वाईट मार्गावर घेऊन जात आहे. हे देश महासत्ता बनण्यासाठी मोठे आव्हान आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचार व आचारापासून फारकत घेऊन देश महासत्ता होऊ शकत नाही. त्यासाठी एकनिष्ठ राहून सर्वजण पुढे जाऊ या, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी करून दिली. सूत्रसंचालन निवेदक विश्वराज जोशी यांनी केले. मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी आभार मानले.

यावेळी देवस्थान समितीचे माजी अध्यक्ष महेश जाधव, भाजपचे जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे, मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक, जिल्हाध्यक्ष शशिकांत पाटील, शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, बाळ पाटणकर, प्रा. सुमेधा साळुंखे, कॉ. दिलीप पोवार, मधुकर पाटील, डॉ. भारत खराटे, मावळा कोल्हापूरचे अध्यक्ष उमेश पोवार, सचिन तोडकर, माजी नगरसेवक सत्यजित कदम, ईश्वर परमार, राहुल चव्हाण, अशोक जाधव, प्रदीप उलपे, डॉ. सुनील पाटील, मनोज पाटील, अनिल सरनाईक, प्रसाद वराळे, आनंद तोरस्कर, अभिजित जाधव, बजरंग माने, रमेश उलपे, निशिकांत कांबळे, अश्विन भोसले, राजू जाधव, यशवंत बँकेचे चेअरमन एकनाथ पाटील, संचालक सुभाष पाटील, सर्जेराव पाटील, अवधूत पाटील, उत्तम पाटील, भाऊसाहेब पाटील, बाबासाहेब ढेरे, राजाराम दिवसे, एम. एल. पाटील, आनंदा पाटील, करवीर तालुका भाजप अध्यक्ष हंबीरराव पाटील, राजेंद्र बन्ने, प्रदीप पाटील, दयानंद कांबळे, अमृत सुतार, देवाळे सरपंच सागर पाटील, सुनील पाटील, विशाल पाटील, रमेश पोवार, भवानीसिंह घोरपडे, रणजित जाधव, राज़ जाधव, आनंद शितोळे, कुणाल इंगळे, यदुराज थोरात, सुंदरराव देसाई, हातकणंगले पंचायत समिती सदस्य उत्तम सावंत, नागाव सरपंच अरुण माळी, प्रकाश काशिद, बाजीराव पाटील, जयसिंग पाटील, पांडुरंग पाटील, बाबासो पाटील, विजय पाटील, दीपक लंबे, काशिनाथ कांबळे, डी. जी. माने, राजू माने, उत्तम आंबवडे, सुरेश जाधव, राहुल जाधव, दिगंबर पाटील, राजू गवाळकर, शशिकांत पाटील, राहुल शिंदे, राजू जाधव, जयकुमार शिंदे, किसन कल्याणकर, अशोक पोवार, रमेश मोरे, सचिन जाधव, अतुल कारंडे आदी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांचे ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अक्षय सरवदे.

# केंद्रीय माहिती आयुक्त माहूरकर यांची विद्यापीठास भेट

कोल्हापूर : केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शिवाजी विद्यापीठास त्यांनी आज भेट दिली. यावेळी माहूरकर यांनी इतिहासावर आपले निरातिशय प्रेम असून या विषयामध्येच सर्वाधिक रमतो, असे सांगितले. तसेच उपस्थित असलेल्या सर्वच शिक्षक व अधिकाऱ्यांची त्यांनी आपुलकीने चौकशी केली. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, इंग्रजी अधिविभागाचे डॉ. अक्षय सरवदे, डॉ. शिवाजी जाधव, उपकुलसचिव डॉ. पी. एस पांडव, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या प्रतिमेस अभिवादनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. शिवाजी जाधव. (छाया : पप्पू अत्तार)

# पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांनी शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी डॉ. बाळकृष्ण यांच्या साथीने अखंड पाठपुरावा केला व अंतिमतः विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर या विद्यापीठाने आपला लौकिक सर्वदूर करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यांची ती इच्छा आज फलद्रूप झाली आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे शुक्रवारी सकाळी डॉ. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह प्रशासकीय सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

21 MAY 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘स्तुती’ अंतर्गत विद्यापीठात उपकरण सुविधा केंद्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या ‘स्तुती’ या विशेष प्रशिक्षण उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र हा तब्बल अडीच कोटींचा प्रकल्प मंजूर करण्यात आला. आपत्कालीन अभ्यासक्रम आणि कार्यशाळा यांच्या माध्यमातून विविध उपकरणे आणि विश्लेषणात्मक तंत्राबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी स्तुती हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात प्रत्येक शैक्षणिक संस्था यांना शिवाजी विद्यापीठामार्फत जवळपास ८ लाख ८३ हजार ५०० रुपये एवढी रक्कम हस्तांतरित करता येणार आहे. अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या अथक प्रयत्नातूनच हा प्रकल्प शिवाजी विद्यापीठास मंजूर झाला आहे.



## विद्यापीठासाठी सन्माननीय बाब

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंत विद्यापीठाच्या जडणघडणीमध्ये, या विद्यापीठाचे नाव मोठे करण्यामध्ये बऱ्याच वरिष्ठ मंडळींचा, तसेच आजी–माजी विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे. देशभरात हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विविध आयआयटी, केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठांकडून स्वीकृती मिळणे ही विद्यापीठासाठी सन्मानाची बाब आहे.

– कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के

21 MAY 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘स्तुती’मुळे विद्यापीठाची देशभर स्तुती

## १४ महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांत प्रशिक्षण कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र सरकारच्या ‘विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या सिर्नजिटिक ट्रेनिंग प्रोग्राम यूटिलायजेशन द सायंटिफिक अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर (स्तुती) या विशेष प्रशिक्षण उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्रास अडीच कोटींचा प्रकल्प मंजूर झाला आहे. देशातील महत्त्वाच्या १४ शैक्षणिक संस्थांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठ देशपातळीवर



**शिवाजी विद्यापीठातून...**

पोहचणार आहे.

विज्ञान तंत्रज्ञान अधिविभाग शैक्षणिक संस्थांमधील संशोधन विकास सुविधांचा विस्तार करते त्या योजनेस पूरक अशी योजना म्हणजे ‘स्तुती’ होय. स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाबरोबरर अत्याधुनिक उपकरणे निर्मिती सर्व पायाभूत सुविधा यांची पारदर्शक विभागणीबाबत आग्रही आहे.

> “ शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंत विद्यापीठाच्या जडणघडणीत आजी-माजी विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यापीठातील प्राध्यापकांनी हा वारसा पुढे सुरू ठेवला आहे. देशभरात या कार्यक्रमासाठी विविध आय. आय. टी., केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठांकडून स्वीकृती मिळणे ही सन्मानाची बाब आहे.
>
> **डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू

या अंतर्गत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात प्रत्येक विद्यापीठ, शैक्षणिक संस्था यांना शिवाजी विद्यापीठामार्फत ८ लाख ८३ हजार ५०० रुपये रक्कम हस्तांतरित करण्यात येणार आहे. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहभागी पात्रता निकष ठरविले आहेत.

प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या प्रयत्नांतून हा प्रकल्प शिवाजी विद्यापीठास मंजूर झाला आहे.

स्तुती प्रकल्पाअंतर्गत शिवाजी विद्यापीठ ग्रामीण भागातील कॉलेजमधील विद्यार्थी व इतर विद्यापीठात मधील विद्यार्थ्यांना वैज्ञानिक प्रशिक्षण देणार आहे. १८ विद्यापीठांच्या समन्वयाने सात दिवसांचे प्रशिक्षण शिबिर घेण्यात येणार आहे. त्यापैकी १४ संस्थांनी प्रतिसाद दिला आहे. प्रकल्पाचे प्रमुख डॉ. सोनकवडे हे प्रत्येक ठिकाणी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

सकाळ

# कोल्हापूरची शतमानपत्रे ग्रंथाचे सोमवारी प्रकाशन

कोल्हापूर, ता. २० : कोल्हापुरातील विविध संस्थांनी दिलेल्या निवडक मानपत्रांचा समावेश असलेल्या 'कोल्हापूरची शतमानपत्रे' या ऐतिहासिक ग्रंथाचे प्रकाशन सोमवारी (ता. २३) होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांनी संपादित केलेल्या या ग्रंथात १०१ मानपत्रांचा समावेश आहे. हा कार्यक्रम ताराबाई पार्क येथील विवेकानंद कॉलेज ग्रंथालयाच्या सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता होणार आहे.

शंभर वर्षांत कोल्हापूर महापालिका, शिवाजी विद्यापीठ, राजर्षी शाहू स्मारक ट्रस्ट, माधवराव बागल विद्यापीठ, ताराराणी विद्यापीठ, कलायात्री यांच्यासह अनेक शैक्षणिक, नागरी व सांस्कृतिक संस्थानी विविध क्षेत्रांत असमान्य कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या अनेकांना मानपत्रे प्रदान करून त्यांच्याप्रती ऋणाईतता व्यक्त केली आहे. यातील निवडक १०१ मानपत्रांचा समावेश करत प्राचार्य माळी यांनी 'कोल्हापूरची शतमानपत्रे' हा ग्रंथ संपादित केला आहे. त्याचे प्रकाशन अक्षर दालन संस्थेने केले आहे.

प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे हे उपस्थित राहणार आहे. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ व अक्षरदालन प्रकाशन संस्थेने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. प्रकाश दुकळे व अमेय जोशी यांनी केले आहे.